DR. BABASAHEB AMBEDKAR
MARATHWADA UNIVERSITY,
SUB-CAMPUS, OSMANABAD- 413501
Maharashtra (INDIA)
NAAC Re-accredited 'A'
Telephone No : 866850?680

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
उप परिसर उस्मानाबाद-४१३५०१
महाराष्ट्र (भारत)
नॅक फेरमुल्यांकन 'अ' दर्जा प्राप्त
दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७८६९ ८८

संदर्भ क्र. डॉ.बाआंमवि/उपउ/२०२२/332-41

दिनांक: ०९.०६.२०२२

प्रति,
**विभाग प्रमुख,**
सर्व शैक्षणिक विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
**उप-परिसर, उस्मानाबाद.**

विषय: विद्यापीठ उपपरिसर येथे होणाऱ्या उद्यमिता यात्रेमध्ये विद्यार्थ्यांना उद्योजकता मार्गदर्शना बाबत...
संदर्भ: जा.क्र जिकौविरोवउमाकेंउ/कौवि/१०१६-२१/२०२२ दि.०३.०६.२०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगने मा.संचालक यांच्या निर्देशानुसार कळविण्यात येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर येथे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, उस्मानाबाद यांच्या उपरोक्त संदर्भानुसार विद्यापीठ उपपरिसरातील विद्यार्थ्यांना 'उद्यमिता यात्रेमध्ये' उद्योजकता मार्गदर्शन मिळणार आहे. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी उपपरिसर प्रशासकीय इमारतीच्या समोर दि.१०.०६.२०२२ रोजी स.११:०० वा. उपस्थित राहण्याबाबत आपल्या विभागातील विद्यार्थ्यांना सूचित करावे. जेणेकरुन, उपपरिसरातील विद्यार्थ्यांना शासनाचे उद्योजकता मार्गदर्शन मिळू शकेल.


करिता माहिती व योग्यत्या कार्यवाहीस्तव सादर.

9/6/22

(भगवान ना. फड)
सहायक कुलसचिव

प्रती प्रत : मा.संचालक यांचे स्वीय सहायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर उस्मानाबाद यांना स्नेहादराने अग्रेषित.

# विद्यापीठ उपपरिसरात उद्योजकता मार्गदर्शन



**उस्मानाबाद :** महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आणि युथ एड फाउंडेशन यांच्या एकत्रित प्रयत्नातून 'उद्यमिता यात्रा २०२२' या उद्यमिता यात्रेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या येथील उपपरिसरात आगमन झाले. या अनुषंगाने युथ एड फाउंडेशनचे राज्य समन्वयक मनोज भोसले आणि इतर सदस्य तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विभागातील रिजवान कपूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी विद्यापीठ उपपरिसराचे साहाय्यक कुलसचिव भगवान फड होते. डॉ. सुयोग अमृतराव यांनी उद्यमिता यात्रा या विषयाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. विक्रम शिंदे यांनी केले. आभार वरुणराज कळसे यांनी मानले. यावेळी डॉ. गोविंद कोकणे, डॉ. नितीन पाटील, कक्षाधिकारी विद्याधर गुरव, तुकाराम हराळकर आदी उपस्थित होते.

# उद्यमिता यात्रा २०२२

## ‘एक पाऊल स्वयंरोजगाराकडे...’

**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आणि युथ एड फाउंडेशन यांच्या एकत्रित प्रयत्नामधून राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठा लघु उद्योजकतला प्रोत्साहन देणारा उपक्रम 'उद्यमिता यात्रा.'**

जगावर ओढवलेला कोरोना महामारीचा फटका भारताला पण बसला. या एकंदरीत परिस्थितीचा विपरीत परिणाम ग्रामीण तसेच शहरी अर्थव्यवस्थेवर झाला. अनेकांच्या रोजगारावर त्यामुळे गदा आली आहे. अनेक जणांच्या नोकऱ्या गेल्या, लघु आणि मध्यम व्यवसाय बंद झाले. आता कोरोना ओसरला असताना ह्या सर्व गोष्टींसाठी काम करणे गरजेचे बनले आहे. म्हणूनच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी ने राज्यातल्या लघु व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असणानार्यांना मदत आणि मार्गदर्शन करण्याचे काम हाती घेतलेले आहे .

या अनुषंगाने युथ एड फाउंडेशन महाराष्ट्र शासनाच्या पुढाकारातून राज्यभर उद्यमिता यात्रेचे आयोजन करीत आहे.
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी ची ही उद्यमिता यात्रा राज्यातल्या ३६ जिल्ह्यांमध्ये मध्ये जाऊन, महिला आणि युवकांना व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन देऊन, त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करणार आहे. दि. १० मे रोजी मुंबईतून या यात्रेची सुरूवात होईल आणि त्यानंतर प्रत्येक दिवशी एका जिल्ह्याला भेट देत राज्यभर प्रवास करेल.

४० दिवस, ३६ जिल्हे, ४० प्रशिक्षक, ४००० व्यावसायिक आणि ४००० किमीचा प्रवास असा उद्यमिता यात्रेचे नियोजन आहे. प्रत्येक जिल्ह्यात युथ एड फाउंडेशन तीन दिवसीय प्रशिक्षण शिबिर घेणार आहे. यामधे तज्ञ प्रशिक्षक सहभागी व्यक्तींना मार्गदर्शन करतील. त्यात व्यवसायाचे नियोजन करणे, केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची ओळख करून त्याच्याशी जोडून देणे, त्यासाठी लागणाऱ्या अटीची पूर्तता करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे, आर्थिक तसेच डिजिटल साक्षर करणे, त्या त्या भागाच्या अनुषंगाने व्यवसायांचे पर्याय सुचवणे, व्यवसायासाठी बाजारात संधी कशाप्रकारे शोधल्या पाहिजेत या बद्दल माहिती देणे, जिल्हा उद्यमिता विभागाला त्यांना जोडून देणे अशा अनेक महत्वाच्या विषया संदर्भात प्रशिक्षण दिले जाणार आहे.

नव्या व्यावसायिकांना बीज भांडवलासाठी देखील मदत करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करणार असून, या यात्रेच्या पहिल्या टप्प्यात डिसेंबर २०२२ पर्यंत राज्यात नवे ४००० छोटे व्यावसायिक निर्माण करणे हा यात्रेचा मुख्य हेतू आणि उद्देश आहे. रोजगाराच्या शोधात, ग्रामीण भागातून मोठया शहरामध्ये मोठया प्रमाणात स्थलांतर होत असते. अशावेळी, स्थानिक रोजगार निर्मितीला चालना मिळाल्यास स्थलांतराचा वेग कमी करता येईल. सोबतच स्थानिक रोजगार आणि अर्थव्यवस्थेला चालनाही देता येईल.

स्थानिक रोजगाराच्या निर्मितीसाठी, स्थानिक व्यवसायाची निर्मिती होणे ही काळाची निकड झालेली आहे. व्यवसाय मार्गदर्शन आणि निर्मितीचा उपक्रम हाती घेतलेली ही उद्यमिता यात्रा राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन तळागळातील लोकांना उद्योजक घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. स्थानिक रोजगार, उद्योग आणि स्थानिक बाजार निर्मितीला चालना देण्यासाठीची ही एक ऐतिहासिक चळवळ ठरेल असा विश्वास आहे.

महाराष्ट्र शासन

# जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र

मध्यवर्ती प्रशासकीय ईमारत, तळ मजला, उस्मानाबाद-४१३५०१

Email: osmanabadrojgar@gmail.com

Website: www.mahaswayam.gov.in दरध्वनी : ०२४७२-२२९९४३४

जा.क्र जिकौविरोवउमाकेंउ/ कौवि/ /2022 1016 - 1821 दिनांक:- 03/06/022

/06/2022

प्रति,

१.मा.संचालक,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र,
उस्मानाबाद.

२. मा.प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद.

विषय: उद्यमिता यात्रेमध्ये विद्यार्थ्यांना उद्योजकता मार्गदर्शन उपलब्ध करून देणे बाबत. दि.१०/०६/२०२२.

संदर्भ: १.कौशल्य अभियान अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचे पत्र दि.०६/०५/२०२२.
२.कौशल्य विकास जिल्हा कार्यकारी समिती व उद्यमिता यात्रा या संदर्भात. मा.जिल्हाधिकारी यांनी दि.०१/०६/२०२२ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सुचना.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, युथ एड फाउंडेशन संस्था, पुणे यांच्या मार्फत आयोजित राज्यव्यापी उद्यामिता यात्रा दि.१०/०६/२०२२ ते १२/०६/२०२२ पर्यंत उस्मानाबादेत येत असून जिल्ह्यातील युवक-युवती/ इच्छुक उमेदवारांचे समुपदेशन करून स्वयंरोजगार सुरु करण्याकरिता संस्थेमार्फत उद्योजगता बाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सदर उद्यमिता यात्रे मध्ये संस्थेतील/उपकेंद्रातील विद्यार्थ्यांना (युवक-युवतींना) उद्यमिता यात्रेतील अधिकारी उद्योजकता व स्वयंरोजगार बाबत मार्गदशन करणार आहेत.तरी संस्थेतील/उपकेंद्रातील विद्यार्थ्यांची वेळे नुसार मार्गदर्शनाचा लाभाघेण्याबाबत अवगत करावे हि विनंती.तसेच अधिक माहितीसाठी श्री.मोहम्मद रिझवान कपूर (९८३४०१०७७२)यांच्याशी संपर्क करावा.

| अ.क्र. | उद्यमिता यात्रा भेट देण्यात येणारी संस्था | वेळ |
|---|---|---|
| १. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, उस्मानाबाद. | ११:०० वा. |
| २. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद. | १२:०० वा. |

(मा.जिल्हाधिकारी महोदय यांचे मान्यतेने.)

(सं.रा.गुरव)
सहायक आयुक्त,
जिल्हा कौशल्य विकास रोजगार
व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, उस्मानाबाद.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

१.मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद.